**ठळक बातम्या**

- घरगुती एलपीजी सिलिंडरच्या दरात २९ रुपयांची वाढ
- येत्या २१ जूनला होणाऱ्या नीट यूजी पुनर्परीक्षेची प्रश्नपत्रिका फुटल्याचा दावा एनटीएनं फेटाळला, अफवांवर विश्वास न ठेवण्याचं आवाहन
- राष्ट्रीय पुरस्कार विजेता मल्याळी अभिनेता सलिम कुमार यांचं निधन

**आणि**

- फ्रेंच ओपन टेनिस स्पर्धेत महिला एकेरीत १९ वर्षीय मिरा अँड्रीवानं पटकावलं विजेतेपद

**<><><><><>**

स्वयंपाकासाठीच्या घरगुती एलपीजी सिलिंडरच्या दरात २९ रुपयांची वाढ करण्यात आली आहे. १४ किलोच्या सिलिंडरच्या दरातली ही वाढ आजपासून लागू होणार आहे. गेल्या तीन महिन्यातली ही दुसरी दरवाढ आहे. या वाढीमुळे दिल्लीत घरगुती एलपीजी सिलिंडरचे दर ९१३ वरून ९४२ रुपये झाली आहे. तर मुंबईत सिलिंडरचे दर ९१२ रुपये ५० पैशांवरून ९४१ रुपये ५० पैसे इतका झाले आहेत.

**<><><><><>**

आंतरराष्ट्रीय स्तरावर स्वयंपाकाच्या गॅसच्या दरात मोठी वाढ होत असली तरी भारतात एलपीजी सिलेंडर जागतिक स्तरावरच्या सर्वात कमी दरात मिळत असल्याचं केंद्र सरकारनं म्हटलं आहे. अमेरिका, कॅनडा आणि ऑस्ट्रेलिया यांसारख्या विकसित अर्थव्यवस्थांच्या तुलनेत भारतात एलपीजी स्वस्त आहे, असं केंद्रीय पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्रालयाच्या निवेदनात म्हटलं आहे. अस्थिर जागतिक ऊर्जा बाजारातल्या उलाढालींपासून ग्राहकांचं संरक्षण करण्यासाठी सरकारनं स्वतः वाढीव किमतीचा मोठा वाटा उचलला आहे, असं यात म्हटलं आहे.

**<><><><><>**

येत्या २१ जूनला होणाऱ्या नीट यूजी २०२६ च्या पुनर्परीक्षेची प्रश्नपत्रिका फुटल्याचा दावा एनटीए, अर्थात राष्ट्रीय चाचणी संस्थेनं फेटाळला आहे. विद्यार्थी आणि त्यांच्या

पालकांमधल्या परीक्षेबाबतच्या तणावाचा गैफायदा घेऊन अशा अफवा पसरवणाऱ्या संघटित टोळ्यांचं हे काम असल्याचं एनटीए नं समाज माध्यमावरच्या पोस्ट मध्ये म्हटलं आहे. परीक्षा प्रक्रियेची विश्वासार्हता अबाधित असून, उमेदवारांना सुरक्षित आणि निष्पक्ष पद्धतीनं परीक्षा देता यावी, यासाठीच्या उपाययोजना करण्यात आल्याचं यात म्हटलं आहे.

परीक्षेबाबतची समाजमाध्यमांवरची आक्षेपार्ह सामग्री तात्काळ ओळखून सायबर गुन्हे शाखेला त्याबाबत माहिती दिली जात असून, संबंधित प्लॅटफॉर्म विरोधात कारवाई केली जाईल. उमेदवार आणि त्यांच्या पालकांनी अशा कोणत्याही संदेशाला प्रतिसाद देऊ नये, त्यासाठी पैसे देऊ नयेत, आणि ते पुढे पाठवू नयेत. तसंच उमेदवारांनी अफवांकडे दुर्लक्ष करावं आणि केवळ एनटीए चं अधिकृत संकेतस्थळ आणि माध्यमांद्वारे प्रसिद्ध झालेल्या अधिकृत माहितीवरच अवलंबून राहावं असं आवाहन एनटीए नं केलं आहे.

**<><><><><>**

सीबीएसई अर्थात केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाच्या यंदाच्या १२वी च्या परीक्षेसाठी निकाल-पश्चात सेवा पुरवणाऱ्या पोर्टलवर आढळून आलेल्या त्रुटींची पडताळणी आणि प्रश्नपत्रिकेच्या पुनर्मुल्यांकनासाठी अर्ज दाखल करण्याचा आज शेवटचा दिवस आहे. हे पोर्टल आज मध्यरात्रीपर्यंत खुलं राहणार असून, विद्यार्थ्यांनी मुदत संपण्यापूर्वी आपले अर्ज पूर्ण करून सादर करावेत, असं सीबीएसई नं समाज माध्यमावरच्या पोस्ट मध्ये म्हटलं आहे.

**<><><><><>**

परीक्षा आणि प्रवेश परीक्षांमध्ये होत असलेल्या कथित अनियमितता आणि पेपरफुटीची जबाबदारी घेऊन केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान त्यांच्या पदाचा राजीनामा देईपर्यंत आपलं आंदोलन चालूच राहील असं कॉकरोच जनता पक्षाचे संस्थापक अभिजित दीपके यांनी म्हटलं आहे. आपल्या पक्षाच्या नेतृत्त्वाखाली काल नवी दिल्लीत केलेल्या निदर्शनात सुमारे ७ हजार लोक सहभागी झाले होते, आणि हे आंदोलन यशस्वी झालं, असा दावा त्यांनी केला. हे आंदोलन लवकरच देशव्यापी करणार असल्याचं त्यांनी आज छत्रपती संभाजीनगर इथं वार्ताहरांशी बोलताना सांगितलं.

**<><><><><>**

राज्यसभेच्या येत्या १८ जूनला होणाऱ्या निवडणुकीसाठी तेलगू देसम पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष एन. चंद्राबाबू नायडू यांनी आज आपल्या तीन उमेदवारांच्या नावांची घोषणा केली.

यामध्ये उद्योजक सना सतीश, शिक्षणतज्ज्ञ भाष्यम रामकृष्ण आणि पक्षाच्या समाज माध्यम खात्याचे प्रमुख चिंताकायाला विजय यांचा समावेश आहे. आंध्र प्रदेशात रिक्त होणाऱ्या चार जागांपैकी एक जागा जनसेना पक्षाला देण्यात आली असून, त्यांनी निवडणुकीसाठी लिंगमनेनी रमेश यांना आपला उमेदवार म्हणून नामनिर्देशित केलं आहे.

**<><><><><>**

इंडिया आघाडीच्या उद्या होणाऱ्या बैठकीत पक्षाच्या वतीने खासदार जॉन ब्रिटास सहभागी होणार असल्याचं मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाने आज जाहीर केलं. केरळ विधानसभा निवडणुकीत माकपचे नेते पिनरायी विजयन यांच्यावर भाजपासोबत लागेबंधे असल्याचा आरोप काँग्रेस नेते राहुल गांधी आणि मल्लिकार्जून खरगे यांच्यासह राज्यातल्या नेत्यांनी केला होता. याबाबत माकप महासचिव एम. ए. बेबी यांनी मल्लिकार्जून खरगे यांना पत्र लिहून नाराजी व्यक्त केली आहे. असे आरोप आघाडी धर्माशी विसंगत आहेत, असं ते म्हणाले. काँग्रेसकडून अद्याप कोणतंही स्पष्टीकरण आलं नसून आपण स्पष्टिकरणाच्या प्रतीक्षेत आहोत, असं बेबी यांनी म्हटलं आहे. तसंच इंडिया आघाडीच्या बैठकीत जॉन ब्रिटास हे हा मुद्दा उपस्थित करणार असल्याचं माकपने सांगितलं.

**<><><><><>**

भारत आणि इंडोनेशिया दरम्यानच्या द्विपक्षीय संबंधांमध्ये गेल्या चार वर्षांच्या काळात लक्षणीय सुधारणा झाल्याचं परराष्ट्र व्यवहार मंत्री डॉ. एस जयशंकर यांनी म्हटलं आहे. ते आज नवी दिल्ली इथं भारत-इंडोनेशिया संयुक्त आयोगाच्या चौथ्या बैठकीला संबोधित करत होते.

भारत-इंडोनेशिया दरम्यानच्या द्विपक्षीय संबंधांना गेल्या वर्षी ७५ वर्ष पूर्ण झाली असून, या बैठकीत राजकारण, संरक्षण, सुरक्षा, सागरी क्षेत्र, व्यापार आणि गुंतवणूक, आरोग्य, औषधनिर्माण, अन्नसुरक्षा, पर्यटन, तसंच शिक्षण आणि सांस्कृतिक सहकार्य, यासारख्या द्विपक्षीय सहकार्याच्या विविध क्षेत्रांवर सविस्तर चर्चा करण्यासाठी आपण उत्सुक असल्याचं ते यावेळी म्हणाले.

**<><><><><>**

आज जागतिक अन्न सुरक्षा दिवस आहे. संयुक्त राष्ट्रांची अन्न आणि कृषी संघटना दर वर्षी ७ जून रोजी जगभरातल्या विविध आरोग्य विषयक आणि नागरी संस्थांबरोबर हा दिवस साजरा करते. ‘समस्येपासून समाधानापर्यंत - सर्वत्र सुरक्षित अन्न’ ही यंदाची संकल्पना आहे.

नागरिकांच्या सुरक्षित भविष्यासाठी, सुरक्षित आणि आरोग्यदायक अन्न उपलब्ध करून द्यायला सरकार वचनबद्ध असल्याचं केंद्रीय आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री जगत प्रकाश नड्डा यांनी जागतिक अन्न सुरक्षा दिना निमित्त जारी केलेल्या संदेशात म्हटलं आहे.

**<><><><>**

राष्ट्रीय पुरस्कार विजेता मल्याळी अभिनेता सलिम कुमार यांचं काल कोची इथं निधन झालं. ते ५७ वर्षांचे होते. त्यांच्यावर गेल्या अनेक दिवसांपासून उपचार सुरू होते. आपल्या तीन दशकांच्या अभिनयाच्या कारकिर्दीत सलिम कुमार यांनी जवळपास साडे तीनशे चित्रपटात काम केलं. ते आपल्या विनोदी शैलीसाठी ओळखले जात असत. ‘अदामिंते मकन अबु’ या चित्रपटातल्या भूमिकेसाठी त्यांना राष्ट्रीय पुरस्काराने गौरवण्यात आलं होतं. अचनुरंगता विदू या चित्रपटातल्या भूमिकेसाठी त्यांना सहाय्यक सर्वोत्कृष्ट अभिनेत्याचा राज्य पुरस्कार मिळाला होता तसंच अयलुम निजनुम या सिनेमातल्या भूमिकेसाठी सर्वोत्कृष्ट विनोदी नटाचा पुरस्कार मिळाला होता. सलिम कुमार यांनी तमिळ, ओडिया आणि बंगाली चित्रपटातही काम केलं आहे. सलिम कुमार यांच्यात कोणत्याही प्रकारची भूमिका साकारण्याची क्षमता होती अशा शब्दात केरळचे मुख्यमंत्री व्ही. डी. सतीशन यांनी त्यांचा गौरव केला आणि आदरांजली वाहिली.

**<><><><>**

इराणचे केवळ हल्ल्यासाठी वापरले जाणारे दोन ‘वन-वे’ ड्रोन आपण नष्ट केले असून, होर्मूझच्या समुद्रधुनीतल्या आंतरराष्ट्रीय सागरी वाहतुकीसाठी ते धोकादायक असल्याचं अमेरिकेच्या मध्यवर्ती संस्थेनं जारी केलेल्या निवेदनात म्हटलं आहे. अमेरिकन लष्कर पूर्णपणे सतर्क असून, या पट्यातलं कोणतंही आव्हान परतवून लावण्यासाठी सक्षम असल्याचं यात म्हटलं आहे.

दरम्यान, अमेरिका आणि इराण दरम्यान शांतता प्रस्थापित करण्याच्या उद्देशानं वाटाघाटी करण्यासाठी पाकिस्तानचे गृहमंत्री मोहसिन नक्वी काल तेहरानला पोहोचले.

**<><><><>**

फ्रेंच ओपन टेनिस स्पर्धेत महिला एकेरीत आठव्या मानांकित १९ वर्षीय मिरा अँड्रीवानं पोलंडच्या माया व्हालिन्साकाचा ६-३, ६-२ अशा सरळ सेटमध्ये पराभव करत स्पर्धेचं विजेतेपद पटकावलं. हा अंतिम सामना अवघ्या १ तास २२ मिनिटांत संपला. पुरुष एकेरीत आज जर्मनीच्या अलेक्झांडर ज्वेरेव आणि इटलीच्या फ्लाव्हिओ कोबोली यांच्यात सामना खेळला जाणार आहे. दोन्ही खेळाडू त्यांच्या कारकिर्दीतल्या पहिल्या ग्रँड स्लॅम पदकासाठी खेळणार आहेत.

//<><><><><>//